स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्य विद्याशाखे अंतर्गत मराठी विषयातील पी.एच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधनपूर्व आराखडा

"2000 ते **2020 या काळातील निवडक मराठी ग्रामीण कादंबरींचा चिकित्सक अभ्यास "**

संशोधक

शिंदे रामराव श्रीरंग

स्वामी विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,

जानवळ, ता. चाकूर, जि. लातूर.

मार्गदर्शक

प्रा.डॉ. ढवळे गौतम झरीबा

कर्मयोगी तुळशीराम महाविद्यालय हाडोळती

ता.अहमदपूर, जि. लातूर

संशोधनकेंद्र

भाषाव वाङ्मय संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्च 2023

"2000 ते 2020 या काळातील निवडक मराठी ग्रामीण कादंबरींचा चिकित्सक अभ्यास"

प्रस्तावना :

आधुनिक काळात मराठी साहित्यात अनेक साहित्यप्रकार उदयास आले. काही साहित्यप्रकार हे पाश्चात्य लेखकांच्या अनुकरणातून मराठीत आलेले दिसून येतात. त्यापैकी कादंबरी हा वाङ्ङ्घयप्रकार मराठी साहित्यात आला. कादंबरी हा साहित्यप्रेकार विशालव व्यापक जीवनानुभव चित्रित करणारा आहे. म्हणून साहित्य समाजाचा आरसा आहे असे मानले जाते. 1 मे 1960 रोजी महाराट्र रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि मराठी माणूस मराठी भाषा यालाराजकीय महत्त्व प्राप्त झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने मराठी माणसाच्या मनात चैतन्य निर्माण केले. तसेच मराठी लेखकांच्या जाणिवांनी जन्म घेतला. ग्रामीण भागातील मुले शहरी भागात शिकायला आली आणि या शिक्षणापासूनच यांनी या ग्रामीण जीवन कथा-कादंबरींच्या माध्यमातून रेखाटले. यातून कथा, कादंबरी, नाटक, कविता अशा वेगवेगळया साहित्यप्रकारातून मराठी साहित्यसमृद्ध झाले.

1920 नंतर ग्रामीण साहित्याच्या निमितीला प्रारंभ झाला. 'जनपद' चे 'ग्रामीण' कधी झाले ते निश्चितपणे सांगता येतनसले तरी साधारणतः श्री म. माटे लिहू लागल्यानंतर 'ग्रामीण' ही संज्ञा रूढ झाली असावी असे वाटते.

काहीही असलेतरी 1920 नंतर मराठीमध्ये वेगवेगळ्या वाङ्घय प्रकारांमध्ये ग्रामीण जीवनचित्रणाला प्रारंभ झाला. कविता, कथा आणि कादंबरी यात ठीन वाङ्ङ्ग्य प्रकारांमधून ग्रामीण जीवन प्रकट व्हायला लागले. ग.ल.ठोकर, र.वा. दिघे, वि.बा.हडप, सोपानदेव चौधरी, यशवंत, गिरीश अशी काही कवी, लेखकांची नावे प्रारंभीचे लेखक म्हणून सांगता येतील. ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे हे लेखन आपल्या वैशिष्ट्यांमुळे लोकांना आवडू लागले. पुढे ना.सी. फडके आणि र. वा. दिघे या दोघांच्या कादंबऱ्यांना विभागून पारितोषिक मिळाले होते, अशी नोंद सापडते. ही नोंद अनेक अर्थाने महत्त्वाची आहे.

1920 च्या आसपास सुरु झालेले हे ग्रामीण साहित्य आजही विविध अंगांनी विकसित होत आहे. या साहित्याचा विशेष म्हणजे कविता, कथा, कादंबरी या वाङ्ङ्ग्यप्रकारातून विपुलपणे लिहिले जात आहे. त्या त्या काळातील महत्त्वाच्या लेखकांची आपण नोंद करू लागलो की, ग्रामीण लेखकांचा निर्देश करावाच लागतो. ग.ल.ठोकर, र.वा. दिघे, वि.वा.हडप, श्री.म.माटे, व्यंकटेशम ाडगुळकर, शंकर पाटील, आनंद यादव, रा.रं. बोरांडे, उद्धवशेळके, मनोहर तल्हार, विश्वास पाटील, भास्कर चंदनशिव, ना.धों. महानोर, इंद्रजित भालेराव अशी एक सलग परंपरा निर्देशिता येते. त्या त्या काळामध्ये त्या त्या लेखक-कवींचे काही एक महत्त्वही मान्य करण्यात आलेले होते आणि आहे.

सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक तिमीच्या विरोधात पर्व जीवन आपल्या माहित्या लेखकांनी रेखाटते. मीनातील माने, त्याचे जगणे, स्वभाव, श्रद्धा, अंधश्रद्धा गावातील जगणे इत्यादी जीवन साहित्यिकांनी आपल्या कार्यांतून रेखाटले. शेती हे तर ग्रामीण जीवनाचे मुख्य सूत्र आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतीय ग्रामीण जीवन, रुदी-परंपरेच्या जुलमाखाली दबलेले दिसते. स्वातंत्र्यानंतर ग्रामीण जीवन बन्यापैकी बदललेले दिसते. शिक्षण, सहकारी बैंक, शेतीविषयक साधने यात बदल झाला आणि ग्रामीण जीवन बदलायला लागले. हा बदल साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून मांडला. शेतमजूर, बलुतेदार यांच्याशी असलेले शेतकयांचे नाते जसे गावगाड्यातील इतर घटकांशी असलेले नाते, ग्रामीण माणसाचे प्रश्न, शेतक्र्यांचे प्रत्र, साहित्याच्या माध्यमातून जगासमोर आले. ग्रामीण जीवनाचे दर्शन, शेतीभोवती गुंफले आहे. त्यामुळे शेतीला महत्त्वाचे स्थान आहे. त्यातून ग्रामीण जीवनातील माणसे, त्यांच्यातील संघर्ष, ग्रामीण साहित्यिकांनी त्यांच्या साहित्यातून मांडले.

समकालीन साहित्याच्या माध्यमातून अनेक लेखकांनी ग्रामीण भागातील दुःख, वेदना मांडल्या आहेत. स्वातंत्र्यांच्या **15-20** वर्षानंतरच्या काळात मराठी साहित्यात अनेक नवप्रवाह निर्माण झाले. या नवप्रवाहाच्या पाठीमागे सामाजिक चळवळी होत्या. **1960** च्या दरम्यान व्यंकटेश माडगुळकर, शंकर पाटील,

द. मा. मिरासदार, रंजित देसाई, अण्णाभाऊ साठे इ. लेखकांनी कथा, कादंबऱ्या लिहिल्या. र.वा. दिघे, यांच्या 'पानकळा', 'मराई' या कादंबऱ्यांनी ग्रामीण कादंबरी लोकप्रिय केली.

1960-1970 च्या काळात ग्रामीण वातावरण आणखीन बदल झाला व मध्यमवर्गीय समाजातील लेखकांबरोबर प्रत्यक्ष कष्टकरी, ग्रामीण समाजातून आलेले संवेदनशील लेखकही लिहून लागले. रा.रं. बोराडे, आनंद यादव, शंकरराव खरात, बाबा पाटील, मधु मंगेश कर्णिक, माधव मोरे, बाबुराव बागुल, दत्ता भोसले इत्यादी लेखकांनी ग्रामीण माणसांच्या जीवनाचे आणि वेदनेचे चित्रण केले. 'धग', 'माझा गाव', 'टारफुला', 'गोतावळा', 'पाचोळा' इत्यादी कादंबऱ्यांच्या माध्यमातून ग्रामीण जीवन चित्रित झाले तसेच यंत्र आणि विज्ञानाच्या बदलामुळे खेड्यात झालेले वदल देखील या कादंबऱ्यांच्या माध्यमातून चित्रित झाले.

1970-1980 च्या दशकात ग्रामीण साहित्यातआणखीन काही भर पडली. योगीराज वाघमारे, वा.ग. केसकर, आनंद पाटील, भास्कर चंदनशिव, नागनाथ कोत्तापल्ले इत्यादी लेखकांनी ग्रामीण जीवन चित्रित कले. **1977** च्या सुमारास ग्रामीण साहित्याची चळवळ खऱ्या अर्थाने बहरली. ग्रामीण जीवनातील दुःख आणि वेदना यांचे स्वरूप बदलत गेले आणि यातून साहित्य निर्माण झाले. **1980** नंतर ग्रामीण माणासांच्या शोषणमुक्तीसाठी झगडणारे नायक साहित्यातून टिपले गेले. डॉ. आनंद यादव यांसारख्या लेखकांनी ग्रामीण जीवन आपल्या साहित्यातून मांडले.

2000 ते 2020 या काळात देखील नव्या दमाच्या लेखकांनी आपले साहित्य साहित्यक्षेत्रात आणले. त्यात ग्रामीण भागातील दुःख आणि वेदना मांडणारे माहित्य शेतकऱ्यांचे दुःख मांडणारे साहित्य या नवसाहित्यिकांनी आपल्या कादंबऱ्यांतून रेखाटले. कथाकार आसाराम लोमटे, नवनाथ गोरे यांच्यासारख्या साहित्यिकाना साहित्य अकादमी पुरसकाराने गौरविण्यात आले. सदानंद देशमुख लिखित 'बारोमास', नवनाथ गोरे लिखित 'फेसाटी' या कादंबऱ्या अलिकडच्या काळातील महत्त्वाच्या मानल्या जातात. यांच्यासह अनेक लेखकांनी ग्रामीण जीवन रेखाटले आहे. या सर्व लेखकांच्या ग्रामीण कादंबरीचा, त्यांच्या एकूण साहित्याचा चिकित्सक अभ्यास केल्या जाणार आहे.

अलिकडे ग्रामीण जीवन पूर्णपणे बदलले आहे. प्रस्तुत संशोधनासाठी "2000 ते 2020 या काळातील निवडक मराठी ग्रामीण कादंबरीचा चिकित्सक अअभ्यास" करावयाचा आहे. शेषेराव मोहिते, आनंद पाटील, बाबुराव मुसळे, सदानंददेशमुख, गणेश आवडे, मुशिल धस्कटे, मिलिंद कांबळे, कैलास दौंड, महेंद्र कदम, अनंत राऊत, नवनाथ बाळासाहेव भगकवाड, महेश मोरे इत्यादी ग्रामीण साहित्यिकांच्या कादंबरीचा चिकित्सक अभ्यास प्रस्तत संशोधनात केल्या जाणार आहेत.

संशोधनाचे महत्त्व:

मराठी ग्रामीण कादंबरी साहित्यात अनेक नामवंत लेखकांचा समावेश होतो. 2000 ते 2020 या काळात अनेक लेखकांनी ग्रामीण जीवनातील दुःख आणि वेदना

आपल्या साहित्यांच्या माध्यमातून मांडल्या आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न, स्त्रियांचे पन्न, गावगाड्यातील बलुतेदार, आलुत्तेदारांचे दुःख आणि वेदना गामीण साहित्यिकांनी आपल्या कादंबरीच्या माध्यमातून मांडल्या आहेत. या संशोधन प्रबंधात मराठी ग्रामीण कादंबयांचा स्थूलपणे आढावा घेण्यात येणार आहे. 2000 नंतर मराठी ग्रामीण साहित्यिकांच्या निवडक मराठी कादंबरींचा चिकित्सक अभ्यास करावयाचा आहे. साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असते. त्यामुळे मराठी ग्रामीण कादंबरीत चित्रित झालेले ग्रामीण जीवन, दुःख आणि वेदना, ग्रामीण भागातील जनतेचे प्रश्न इत्यादींचे वर्णन ग्रामीण कादंबऱ्यांतून आलेले आहे. याचा अभ्यास चिकित्सकपद्धतीने करावयाचा आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी "2000 ते 2020 या काळातील निवडक मराठी ग्रामीण कादंबरींचा चिकित्सक अभ्यास" हा विषय निवडला आहे. शेतकऱ्यांच्या जीवनावर अनेक अंगांनी प्रकाश टाकणारे मौलिक संशोधन कार्य होऊ शकेल असे वाटल्याने मी हा विषय निवडला आहे. तसेच मी ग्रामीण भागातून असल्याकारणाने ग्रामीण जीवनाशी माझी नाळ जुळलेली आहे. या भूमिकेतून मला या विषयाच्या असलेल्या कुतूहलामुळे मी या संशोधनाची निवड केलेली आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

कोणतेही संशोधन करत असताना त्या संशोधनाचा उद्देश महत्त्वाचा असतो.

साधारणपणे कोणत्याही संशोधनाची सुरुवात करत असताना ते कार्य व्यवस्थित पार

पाडण्यासाठी काही संशोधनाची उद्दिष्टे ममोर ठेवावी लागतात. संशोधन विशयाची निश्चिती आल्यानंतर त्या संशोधनाची उद्दिष्ट्ये निश्चित झाल्याशिवाय संशोधकाला संशोधनाची योग्य दिशा सापडत नाही. यासाठी संशोधनाची उद्दिष्ट्ये मांडणे महत्त्वाचे ठरते. प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून ग्रामीण जीवनातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय जीवनाचा अभ्यास या काळातील लेखकांनी कसा मांडला आहे हे त्यांच्या साहित्यांच्या अभ्यासातून अभ्यासावयाचा आहे.

ग्रामीण समाजातील स्त्रियांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय प्रश्न व ग्रामीण भागातील एकूण जनतेचे प्रश्न यांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनाच्या माध्यामतून करावयाचा आहे. या संशोधन कार्यासाठी पुढील काही उद्दिष्ट्ये मांडली आहेत. संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी पुढील उद्दिष्ट्ये निश्चित केली आहेत. ती पुढीलप्रमाणे :

1. मराठी कादंबरीतील ग्रामीण संवेदनांचा अभ्यास करणे.

2. मराठी ग्रामीण साहित्यातील ग्रामीण साहित्याचा उगम, विकासयांचा प्रभाव अभ्यासणे.

3. मराठी ग्रामीण साहित्याचे स्वरूप व विकास अभ्यासणे.

4. मराठी ग्रामीण कादंबरीतील विविध अंगाचा अभ्यास करणे.

5. मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्री जीवनाचा अभ्यास करणे

6. मराठी ग्रामीण कादंबरीतील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

7. मराठी ग्रामीण कादंबरीतील बोलीभाषा व भाषाशैलीच्या वेगळेपणाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :-

1. मराठी ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये ग्रामीण जीवनाचे वर्णन लेखकाने केले आहे.

2. मराठी ग्रामीण कादंबरीतून ग्रामीण जीवनातील दारिद्रय, दुःख ववेदनांचे चित्रण आले आहे.

3. मराठी ग्रामीण कादंबऱ्यांतून ग्रामीण जीवनातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक परिस्थितीचे चित्रण आले आहे.

4. मराठी ग्रामीण कादंबरीच्या माध्यमातून लेखकांनी ग्रामीण जीवनातील बदलत्या शोषणाचे संदर्भ मांडले आहेत.

5. मराठी ग्रामीण कादंबऱ्यांवर महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव पडला आहे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधनासाठी "2000 ते 2020 या काळातील निवडक मराठी ग्रामीण कादंबरीचा चिकित्सक अभ्यास" हा विषय निवडला आहे. या संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी संशोधन विषयातील तथ्ये व वस्तुनिष्ठ माहिती शोधण्यासाठी शास्त्रशुद्ध माहितीचा आधार घेतला आहे व विविध संदर्भग्रंथांचा आधार घेण्यात येणार आहे.

संशोधन साहित्याचे संकलन हे वस्तुनिष्ठपणे करण्यासाठी त्यामध्ये व्यक्तिनिष्ठता व पूर्वग्रहदुषितपणा येणार नाही याची काळजी घेण्यात येणार आहे. संशोधन विषयाचे अध्ययन करण्यासाठी संशोधकाला विविध स्वरूपाची माहिती मिळवावी लागते त्यादृष्टीने मराठी साहित्यातील निवडक मराठी ग्रामीण कादंबरीकारांच्या कादंबरींचा व त्यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे. त्यातील प्राप्त तथ्यांच्या आधारावर संशोधन कार्य पार पाडले जाणार आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व निरीक्षणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केल्या जाणार आहे.

संशोधनाची मर्यादा :

संशोधनाच्या दृष्टिने संशोधन कार्यात काही निश्चित काळ व साहित्याची मर्यादा असणे आवश्यक असते. विषयाची निवड करताना विषय अध्ययन करणे सोईस्कर जावे म्हणून व तथ्य संकलन व विश्लेषण करणे सहज शक्य व्हावे म्हणून **"2000 ते 2020** या काळातील निवडक मराठी ग्रामीण कादंबरींच्या माहित्यांच्या चिकित्सक अभ्यास" करण्यात येणार आहे. संशोधन क्षेत्र म्हणजे ज्या विषयाची निवड आपण केली आहे त्याचे अभ्यास क्षेत्र आणि मर्यादा ठरविल्यामुळे संशोधन कार्यास योग्य ती गती मिळते. त्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनासाठी **"2000 ते 2020** या काळातील निवडक मराठी ग्रामीण कादंबरींचा चिकित्सक अभ्यास" हा विषय निवडला आहे. या विषयाची मर्यादा म्हणजे **2000 ते 2020** या काळातीलच निवडक मराठी ग्रामीण कादंबरींचा अभ्यास करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी पुढीलप्रमाणे प्रकरणांची योजना करण्यात आली आहे.

प्रकरणीकरण :-

प्रकरण पहिले : प्रस्तावना

या प्रकरणात विषयाचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहितके, संशोधन पद्धती, संशोधनाची मर्यादा, वाङ्मयीन पार्श्वभूमी व प्रकरण आराखडा यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : ग्रामीण कादंबरीचे स्वरूप, संकल्पना आणि विकासात्मक वाटचाल

प्रस्तुत प्रकरणात ग्रामीण कादंबरीच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास करावयाचा आहे. मराठी ग्रामीण कादंबरीचे स्वरूप, संकल्पना आणिविकासात्मक वाटचाल, निवडक मराठी कादंबरीकारांच्या कादंबऱ्या, त्यांचे स्वरूप, त्यांच्यावर पडलेला प्रभाव, त्यांच्या साहित्यातील स्त्री चित्रण व कलाकृतींचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : मराठी ग्रामीण कादंबरीतील ग्रामीण जीवन, स्त्री व्यक्तिरेखा, पुरुष व्यक्तिरेख आणि भाषाशैली

प्रस्तुत प्रकरणात ग्रामीण कादंबरीचा विकास अभ्यासल्यानंतर या आत्मकथनातील स्त्री व्यक्तिरेखा, नायिका तसेच स्त्रीजीवनमान, राहणीमान, पुरुष व्यक्तिरेखा याबाबतचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे. तसेच मराठी ग्रामीण कादंबरीतील भाषाशैली यांचा विस्तृत आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : निवडक मराठी ग्रामीण कादंबरीतील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक जीवनचित्रण

प्रस्तुत प्रकरणात निवड मराठी ग्रामीण कादंबरीकारांच्या साहित्यातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक जीवन चित्रणाचा अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच ग्रामीण भागातील स्त्रियांची सामाजिक, राजकीय, कौटुंबिक

परिस्थिती आणि तिचा दर्जा याचाही आढावा थोडक्यात घेण्यात येणार आहे. तसेच राजकीय सहभागाचे चित्रणही अभ्यासले जाणार आहे.

प्रकरण पाचवे : निवडक मराठी ग्रामीण कादंबरीतील ग्रामीण भागातील बदलते शोषणाचे चित्रण

प्रस्तुत प्रकरणात 2000 ते 2020 या कालावधीत येणाऱ्या निवडकमराठी ग्रामीण कादंबरींच्या साहित्यातून येणारे शोषणाचे चित्रण अभ्यासणे, शोषणाचे बदलते संदर्भ, स्वरूप, विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे गावगाड्यात झालेलाबदल यांचे कादंबरीत आलेले चित्रण यांचाही अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रकरणनिहाय सारांश मांडून, गृहितकृत्यांची पडताळणी करण्यात येईल आणि गृहितकृत्यांच्या आधारे निष्कर्ष मांडण्यात येतील.

टीप :- संशोधनाला जशी जशी गती येईल तसे तसे संशोधन आराखड्यात थोडाबहुत बदल संभवतो.

संदर्भसूची :-

1.जाधव जयद्रथ (संपा.), "1991 नंतरचे मराठी साहित्य: स्वरूप आणि समीक्षा", संस्कार प्रकाशन, 2010, लातूर.

2. लिंबाळे शरणकुमार, "साठोत्तरी मराठी वाङ्ङ्घयातील प्रवाह", दिलीपराज प्रकाशन प्रा.लि., पुणे.

3. देशमुख सदानंद, "वारोमास", कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, 2002.

4. गोरे नवनाथ, "फेसाटी", अक्षरवाङ्ग्य प्रकाशन, पुणे, सातवी आवृत्ती, ऑगस्ट, 2022.

5. धसकटे सुशील, "जोहार", अक्षरवाङ्ग्य प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर 2015.

6. मोरे महेश, "बोऱ्याची गाठ", लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई, प्रथम आवृत्ती, नोव्हेंबर 2021.

7. कांबळे मिलिंद भिवाजी, "धगीतून चालली ती", नवल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, 2019 8. वार अशोक, "तसव्या", मनोविकास प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट 2013.

8. पवार अशोक, "तसव्या", मनोविकास प्रकाशन, पुणे, प्रथम आवृती, ऑगस्ट 2013.

9. कांबळे मिलिंद भिवाजी, "वांझ", प्रतिमा पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, 2023.

10. कदम महेंद्र, "तणस", लोकवाङ्ग्मयगृह, प्रभादेवी, मुंबई, प्रथम आवृत्ती, 2018.

11. राऊत अनंत, "काहिली", स्वरूप प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, 2018.

12. मोहिते शेषेराव, "धुळपेरणी", देशमुख अॅण्ड कंपनी पब्लिशर्स, पुणे, प्रथम आवृत्ती, 2021.

13. सलालकर राजेंद्र, "साहित्य संशोधन व समीक्षा", एम. के. इन्फोड्युटेक प्रा.लि., पुणे, प्रथम आवृत्ती, जून 2021.

संशोधक

शिंदे रामराव श्रीरंग

स्वामी विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,

जानवळ, ता.चाकूर, जि. लातूर

मार्गदर्शक

प्रा.डॉ. ढवळे गौतम झरीबा

कर्मयोगी तुळशीराम महाविद्यालय हाडोळती,

ता. अहमदपूर, जि. लातूर

Dr. Gautam Z.Dhawale

Asso. Prof. & Head Dept of Marathi

Karmyogi Tulshiram Pawar College

Hadolti Tq Ahmedpur Dist Latur